UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९१ • डिसेंबर २०२३ • पुरवणी विशेषांक ०९

G20

भारत 2023 INDIA

।। श्री विश्वनाथो विजयते ।।

स्थापना : ९ जानेवारी १९२७

प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

**पुरवणी अंक ९ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)**

- **शके १९४४** • **वर्ष : ९०** • **पुरवणी अंक : ९**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे • प्रा. डॉ. मृदुला वर्मा • प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्रा. डॉ. सुभाष वाघमारे • प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१

दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No. 2394-5990


३६. वारकरी संत साहित्यातील वैश्विक विचार

- डॉ. सुरेखा हरी जाधव ---------------------------------------------------------------- १४४

३७. श्रमण संस्कृती साहित्यातील जागतिक शांतता

- डॉ. मोहन गोविंद लोंढे ---------------------------------------------------------------- १४७

३८. बौद्ध साहित्य आणि शांतता

- डॉ.मीरा माधवराव देठे ---------------------------------------------------------------- १५०

३९. जागतिक शांतता, प्रगती व गोमंतकीय कुळमी लोककथा

- जयेश पाय्क गावकर, डॉ. सुनीता उम्रस्कर ------------------------------------------------ १५३

४०. आदिवासी मराठी कादंबरीतील जीवनमूल्य

- स. प्रा. अनिल वळवी, प्रा. डॉ. राजेंद्र ठाकरे ---------------------------------------------- १५७

४१. महात्मा गांधी विचार आणि स्त्री

- प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे ---------------------------------------------------------- १६१

४२. मानवी प्रगतीसाठी भागवत संप्रदायातील संतांचे विचार

- डॉ. विजय रेवजे ---------------------------------------------------------------------- १६३

४३. जागतिक शांततेसाठी विविध धर्मांचे योगदान

- प्रा. डॉ. एस. डी. लांडे ---------------------------------------------------------------- १६५

४४. जागतिक शांतता आणि मार्क्सवादाच्या प्रभावातील मराठी साहित्य

- प्रा. प्रवीण सदानंद गायकर -------------------------------------------------------------- १७०

४५. जागतिक, सामाजिक शांतता आणि संत साहित्यातील उपयुक्त अभंग

- प्रा.डॉ आर.डी.शिंदे ---------------------------------------------------------------------- १७४

४६. 'जागतिक शांततेसाठी ख्रिस्ती साहित्याचे सांस्कृतिक योगदान'

- प्रा. डॉ. अतुल नारायण चौरे ---------------------------------------------------------- १७८

४७. जागतिक शांतता व प्रगतीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे योगदान

- प्रा. डॉ. संदीप भगवान वाकडे ---------------------------------------------------------- १८१

ISSN No. 2394-5990

# जागतिक शांतता, प्रगती व गोमंतकीय कुळमी लोककथा

**जयेश पाय्क गावकर**
लेखक, संशोधक विद्यार्थी आणि
सहायक प्राध्यापक, मराठी अध्ययनशाखा
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा
गोवा विद्यापीठ, jayeshgaonkar429@gmail.com
फोन नं. : ९४२०६४०४५७

**डॉ. सुनीता उम्रस्कर**
सहलेखक, विद्यावाचस्पती मार्गदर्शक आणि
सहयोगी प्राध्यापक, मराठी अध्ययनशाखा
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा
गोवा विद्यापीठ, sunitaunigoa.ac.in
फोन नं. : ९८८१२५६१३३

**प्रास्ताविक :**

'वसुधैव कुटुंबकम्' अर्थात 'जग एक परिवार आहे' असा उल्लेख महा उपनिषदात सापडतो. समग्र भारतीय संस्कृतीचे हे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. वैदिक वाङ्मय, पुराण, उपनिषदे, लोकसाहित्य, संतसाहित्य आणि अन्य धार्मिक, आध्यात्मिक वाङ्मय आदींनी मानवाला नीतिमत्ता, शांती आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न प्रारंभापासून केलेला आहे. उपरोक्त स्वरूपाचे कार्य विविध भाषांतील साहित्य शांती, विश्वबंधुत्व आणि प्रगती ही अप्रत्यक्ष प्रयोजने मानून करत आहे. असे असूनही वर्तमानातील संघर्षपूर्ण वातावरण पाहिल्यास जागतिक शांतता व प्रगतीसाठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संकल्पनांचा पुनर्विचार अगत्याचा ठरतो. माणसा - माणसांमधील संघर्षाची कारणे अनेक आहेत. तद्वत एका राष्ट्राचा दुसऱ्या राष्ट्राशी संघर्ष आहे. अव्वल स्थान मिळवण्याची आणि आर्थिक उच्चांक गाठण्यासाठी प्रत्येक राष्ट्राची धडपड सुरू आहे. या स्पर्धेत माणूसकी मागे पडून तणावग्रस्थ स्थिती निर्माण होते हे वास्तव नाकारता येत नाही. गरीबी, आर्थिक ओढाताण, प्रदुषण, उपासमारी, भ्रष्टाचार, आतंकवाद, विविध आजार इत्यादी वेगवेगळ्या समस्यांशी सर्वसामान्यांचा सततचा संघर्ष सुरू आहे. अमानवी कृत्यांची वैश्विक समाजातून होत असलेली वाढ शांती आणि प्रगतीचा वेग मंदावण्यास कारण ठरत आहे. अशा परिस्थितीत 'एकमेकां सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हा विचार संपूर्ण जगाला पुनश्च पटवून सांगण्याची गरज आहे. खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे अशी विनवणी साने गुरूजींनी केली. या भूतलावर अनेक धर्माचे, जातीचे, पंथांचे लोक वास्तव्य करतात; प्रत्येकाशी बंधुभावाने वागण्याची आणि ही नैतिक शिकवण सार्वभौम बनविण्याची नित्तांत गरज आहे. मुळात मानवी मूल्यांचे जतन करणे आणि त्याप्रमाणे वागणे हाच मानवाचा खरा धर्म होय. गोमंतकीय कुळमी लोकसाहित्यात स्वभावत: शांतीतत्त्वांची मूल्यदृष्टी आणि समाजमान्य प्रगती आयामांची अभिव्यक्ती झालेली आहे. लोकसाहित्य हा समुहमनाचा आविष्कार आहे. ज्ञलोकफला समुहबलाची, संघबलाची जाणीव आहे. 'संघबलम् परमं बलम्' या उक्तीची तंतोतंत जाण असलेल्या गोमंतकीय कुळमी जमातीतील लोककथांतून अभिव्यक्त होणाऱ्या शांती आणि प्रगतीविषयक कल्पनांचा उहापोह प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे करायचा आहे.

**गोमंतकीय कुळमी जमात :**

गोमंतकातील काणकोण, केपे, सांगे तालुक्यात मोठ्या प्रमाणात वास्तव्य करणारी आणि लोकपरंपरा जपणारी 'कुळमी' ही अत्यंत महत्त्वाची लोकजमात होय. गोमंतकीय सांस्कृतिक जनजीवनातील या समाजाचे योगदान लक्षात घेऊनच पद्मश्री विनायक खेडेकरांनी या जमातीविषयी 'पर्यावरण संस्कृतीचे जनक आणि रक्षक' असा आदरपूर्ण उल्लेख केलेला आहे. स्वतःला बळीवंशीय मानणाऱ्या व समृद्ध लोकसाहित्याचा वारसा लाभलेल्या या लोकजमातीत लोककथांचा संपन्न साठा आहे. ''मुळात 'कुळमी' हा 'वेळीप' आणि 'गावकर' अशा दोन जात नामांमध्ये विभागलेला समाज आहे. जो गोमंतकाच्या सह्याद्रीच्या डोंगरमाथ्यावर आणि पठारी प्रदेशात राहून 'कुमेरी' पद्धतीने शेती करून आपले जीवन जगत आलेला आहे. हा समाज मुळात 'बळीवंशीय'असून तो 'प्रोटो ऑस्टोलॉईड' वंशाशी संबंधित आहे.''[१]

**सगळे सुखी जाता! राज्य सुखी जाता! तशे तुमी आमी सुखी जावों!**

एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ हे तुकाराम महाराजांचे वचन समुहजीवन जगत असताना अत्यंत महत्त्वाचे ठरते. एका माणसाने दुसऱ्याची कोणतीही अपेक्षा न बाळगता मदत करणे हा मानवी धर्म होय. कुळमी लोकवाङ्मयातही असे अनेक विचार विविध लोकवाङ्मय प्रकारातून डोकावतात. मुळात लोकसाहित्य लोकांचे असते. सामुहिक भावभावना लोकसाहित्यातून प्रकट केल्या जातात. थोडक्यात लोकमन, समुहमन लोकवाङ्मयातून व्यक्त होते. तेव्हा 'एकट्याचे कल्याण

होवो' असा विचार लोकवाङ्मयात शक्यतो केला जात नाही. लोकांचं भलं व्हावं, कल्याण व्हावं असाच विचार लोक करतात. उदाहरणार्थ: कुळमी लोकांत 'एका राजाची कथा' सांगितली जाते. ती कथा संपल्यानंतर शेवटी ''सगळे सुखी जाता! राज्य सुखी जाता! तशे तुमी आमी सुखी जावों!''[१२] असा उल्लेख कथनकर्ता करतो. एकंदरीत या कथेचे प्रयोजन आणि शांती संकल्पनेचे 'लोक'ला अवगत असलेले तत्त्व या कथेच्या शेवटी स्पष्ट होते. अर्थात कथेतील पात्रे सुखी झालेली आहेत, पूर्ण राज्यही सुखी झालेले आहे; तेव्हा तुम्ही आम्ही सुखी होवो असे उद्गार लोककथाकथनकार शेवटी काढतो. समस्तांचा चांगला विचार करणे, ''सुखी होवो!'' असा आशीर्वाद देणे हा मानवी धर्म 'लोक'ला अवगत आहे. वर्तमानात जागतिक शांतता प्रस्तापित करायची झाल्यास चांगले नातेसंबंध तयार करून, बंधु-भावाने एकमेकांशी वागणे आवश्यक आहे. माणसांमाणसांत बंधुत्त्वाचे नातेसंबंध प्रस्थापित झाल्यास प्रगती करणे सहज शक्य आहे. वर्तमानात अनेक राष्ट्रांतून अशांती आणि संघर्षांचे युद्धमय वातावरण आहे. माणसांमाणसांतील नाते संबंधांची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. अशा परिस्थितीत मनात असलेले सगळे षडरिपु बाजूला सारून विश्वशांतीसाठी एकजुटींने प्रयत्न होणे आवश्यक आहे. विश्वशांती आणि प्रगती हा विषय विश्वव्यापी असल्यासही त्यासाठी आवश्यक सकारात्मक बदल व्यक्तीकेंद्री आहेत. म्हणूनच या विश्वव्यापी विचारांची दखल व्यक्तीगुणांतील बदलांनीच पडताळणे ही काळाची गरज होय.

**सामुहिकता, निर्णयन आणि संयम :**

'गडबडीत वा धावपळीत घेतलेले निर्णय बहुतांशी संकटाना दिलेले आमंत्रण ठरते.' त्यासाठी योग्य विचार करून निर्णय घेणे अगत्याचे आहे. एकदा कमानातून तीर सुटला तर तो पुन्हा मागे येत नाही. वर्तमानातही जागतिक पातळीवर असेच काही झाल्याचे आढळून येते. तणावग्रस्त स्थितीत आणि गडबडीत अनेक अयोग्य निर्णय घेतले जातात. या निर्णयांचे रूपांतर मग प्रलयकारी युद्धात किंवा संघर्षात होते. म्हणून मागचा पुढचा विचार करून निर्णय घेणे योग्य ठरते. या अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करणारी व जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य असलेली ङ्गगोष्टीफनावाची कथा या जमातीत सांगितली जाते. थोडक्यात कथेचा आशय पुढीलप्रमाणे-

'भाऊ तीन रूपये घेऊन सामान आणण्यासाठी चालत बाजाराला जातो. चालताना वाटेत एक म्हातारा भेटतो. अनोळखी असल्यामुळे दोघेजण एकमेकांशी बोलत नाहीत. भाऊ त्या म्हाताऱ्याला बोलायला सांगतो. तद्प्रसंगी 'दर एक घट (वाक्य) बोलायला एक रूपये घेईन. मान्य असल्यास बोलतो.' अशी म्हातारा अट घालतो. भावाला अट मान्य होते. तो त्या म्हाताऱ्याला एक रूपया देतो. पैसे हातात पडल्यानंतर तो एक वाक्य बोलतो. एकट्याने कुठे जाऊ नये, बरोबर कोणी तरी असायला पाहिजे. म्हातारा पुन्हा गप्प चालायला लागतो. भाऊ कंठाळतो. पुन्हा एक रूपया म्हाताऱ्याच्या हाती ठेवतो. हातात रूपया आलेला म्हातारा दुसरे वाक्य बोलतो. कोणीही काही सांगितले तर ते ऐकून घ्यावे. म्हातारा पुन्हा गप्प चालायला लागतो. भाऊ कंठाळतो. पुन्हा एक रूपया म्हाताऱ्याच्या हाती ठेवतो. हातात रूपया आलेला म्हातारा तिसरे वाक्य बोलतो. कितीही कोणाचा राग आला तरी उगीच कोणाला मारू नये. कृतीपूर्वी शंभर अंक मोजावेत.

या सगळ्या सांगितलेल्या तिन्ही घटांचा (वाक्यांचा) फायदा त्याला पुढे कसा होतो? हे रहस्य सोडविण्याचा प्रयत्न कथेत केलेला आहे. पुढे रात्री उशीर झाल्यामुळे तो झोपण्याचा निर्णय घेतो. त्या वेळी भावाला पहिल्या वाक्याची आठवण होते. एकट्याने कुठे जाऊ नये, बरोबर कोणी तरी असायला पाहिजे. म्हणून जवळच असलेला एक खेकडा तो आपल्या बाजूला घेऊन तो झोपी जातो. तो झोपलेल्या ठिकाणी भला मोठा साप भावाला खाण्यास येतो त्यावेळी खेकडा त्या सापाला खातो. खेकडाच भाऊचा जीव वाचवतो.

सकाळी बाजारातून जात असताना पोलिस भावाला बोलवतो. कोणीही काही सांगितले तर ते ऐकून घ्यायला पाहिजे. हे म्हाताऱ्याचे वाक्य त्याला आठवते. पोलिस त्याला एक मेलेल्या माणसाचे शरीर बाजूला काढायला सांगतो. पोलिस हे काम करण्यासाठी त्याला स्वतः पैसे देतो. त्या मृत माणसाच्या खिशात काही राहिलेले पैसे त्याला मिळतात.

पुढे रात्री घरी गेल्यावर बहिणीच्या पलंगावर एक तरूण मुलगा झोपल्याचे दृश्य त्याच्या दृष्टीस पडते. त्या मुलाला पाठीमागून मारण्याचा विचार त्याच्या मनात येतो इतक्यात त्याला म्हाताऱ्याची पुन्हा आठवण होते. तो शंभरपर्यंत अंक मोजतो. तोपर्यंत मुलाचे कपडे घालून झोपलेली पलंगावरची भावाची बहीण उठते. 'घरात कोणी पुरूष माणूस नसल्याने मी संरक्षणाचा हेतू बाळगून तुमचे कपडे घालून झोपली.' असे ती सांगते. केवळ शंभरपर्यंत अंक मोजल्यानेच बहिणीचा जीव वाचतो.

उपरोक्त कथा थोडीशी अवास्तव, कल्पित, योगायोगाचा वापर करून रचलेली असली तरी या कथेतून अनेक महत्त्वाचे विचार वा विधाने सांगितलेली आहे. जी विधाने प्रत्येकासाठी महत्त्वाची आहे. पहिले विधान म्हणजे एकट्याने कुठे जाऊ नये, बरोबर कोणी तरी असायला पाहिजे याचा अर्थ प्रत्येकाला एकमेकांची आवश्यकता भासते. तेव्हा मिळून मिसळून राहायला पाहिजे. कोण कधी; कोणत्या प्रसंगी मदत करेल हे सांगता येत

ISSN No. 2394-5990

नाही. दुसरे विधान म्हणजे कोणीही काही सांगितले तर ते ऐकून घ्यावे याचा अर्थ लोकांचे म्हणणे अगोदर ऐकून घेणे व मग स्वतः निर्णय घेणे. कधी कधी लोकांचे म्हणणे ऐकून न घेतल्यामुळे अनेक संधीना मुकण्याची शक्यता असते. तिसरे विधान म्हणजे कितीही राग आला तरी उगीच कोणाला मारू नये. अथवा निर्णयापर्यंत जाऊ नये. तद्पूर्वी शंभरपर्यंत अंक मोजावेत याचा अर्थ रागाच्या भरात निर्णय न घेणे, स्वतःवर संयम ठेवणे. अशी शिकवण ही कथा देते. कारण तणावग्रस्त आणि घाई गडबडीत विचार न करता घेतलेले अयोग्य निर्णय मोठ्या संकटाला आमंत्रण ठरू शकते आणि घाईगडबडीतील निर्णय अशांती आणि विकासाच्या मार्गक्रमणावरील अडथळे ठरू शकतात.

**वडिलधाऱ्यांचा आदर आणि चुकीला क्षमा :**

कुळमी जमातीत 'भिकशेन' नावाची कथा प्रचलित आहे. कथा अद्भूतरम्य असली तरीही या कथेच्या माध्यमातून व्यक्त झालेले विचार जागतिक शांतता प्रस्तापित करण्यास समर्थ आहेत. मानवकडून काही वेळा कळत-नकळतपणे चूक होते. या चुकलेल्याना क्षमा करणे आणि ती चूक सुधारण्यासाठी व प्रायश्चितासाठी त्यांना वेळ देणे हे मानवाचे कर्तव्य आहे. क्षमा करणे माणसासाठी तसे कठीण असते. कारण माणसाच्या मनात अहं, अहंकार भरलेला असतो. या अहंकाराला बाजूला ठेवून असे निर्णय प्रत्येकाने घेतल्यास सगळ्याच योजलेल्या गोष्टी करणे शक्य होऊ शकतात. तोच व्यक्ती असे निर्णय घेऊ शकतो ज्याचे मन मोठे असते आणि अहंकार बाजूला असतो. असा दृष्टीकोन समाजाला देणे आवश्यक आहे. 'ईंट का जवाब पत्थर से' या वृत्तीचा सदैव केलेला स्वीकार धोक्याचा ठरतो. युगप्रवृत्ती बरीच संहारक आहे. 'माफी' अथवा 'माफ करणे' ही जीवनमूल्ये ठरू शकतात याचा विसर पडलेला समाज सर्वत्र अनुभवता येतो. आगळीक घडलेल्याला पुन्हा पुन्हा अपराधाची जाणीव करून दिली जाते. सामाजिक पातळीवर माफी तर सोडाच उलटपक्षी अपराधासाठी उपेक्षा मात्र त्यांच्या नशिबी येते. ती चूक कशी सुधारता येईल याविषयी विचारविनीमय न करता बोचणे, कोचणे, कोसणे या कृतींचीच पुनरावृत्ती अपराध्याच्या जीवनाला भयावह बनवते. सूडाची भावना मनात ठेवून कार्य केले जाते. परिणामी या सगळ्याचे रूपांतर सामाजिक अशांततेत, संघर्षात वा युद्धात होते.

कुळमी जमातीत संपूर्णमानवजातीला शिकवण देणारी 'भिकशेन' नावाची कथा सांगितली जाते. 'चुकलेल्यांना क्षमा करणे', 'वडिलधाऱ्यां माणसांना आदर देणे', 'प्रायश्चित करण्याची संधी देणे' अशी शिकवण ही कथा थोडक्यात पुढीलप्रमाणे -

'एक राजा आपल्या जावयाला मारण्याचा प्रयत्न करतो. काही कारणांमुळे राजाचा प्रयत्न फसतो. जावयाच्या जागी तो स्वतःच्या मुलाचा गळा कापतो. मुलाचा खून आपल्या हातून झाल्यामुळे स्वतः जीवंत राहून फायदा नाही असा विचार करत तो स्वतःचा गळा कापून घेतो. आपल्यामुळे हे सगळे घडले असा विचार करत जावई स्वतः गळा कापण्याचा प्रयत्न करतो. तेवढ्यात काकादेवी प्रसन्न होते. त्याची इच्छा विचारते. हवं ते मागायला सांगते. अशावेळी तो आपल्या सासऱ्यांना आणि मेव्हुण्याला जीवंत करण्याची इच्छा व्यक्त करतो. त्याला धन संपत्ती मागता आली असती; तरीही तो ते काही न मागता; आपल्याला मारण्याचा कट रचणाऱ्या व्यक्तीनाच जीवंत करायला सांगतो. 'चुकलेल्याना क्षमा करणे' व 'प्रायश्चिताची संधी देणे' हा बोध ही कथा देते. तसेच पुढे आपल्या सासऱ्यांचा आशीर्वाद घेतो. मोठ्याप्रती मनात असलेला आदरभावही या कथेत दिसतो. हे विचार जागतिक शांततेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रेम, शांती आणि क्षमा ही तीन तत्त्वे प्रत्येक धर्मसंकल्पनेत सांगितली गेलेली आहे. बहुतांशी गोमंतकीय लोककथांतून मनोरंजन हे तत्त्व प्रमाण मानलेले असले तरी उपरोक्त तिन्ही तत्त्वांचा पुरस्कार कुळमी लोककथांनी केलेला आहे.

**समारोप :**

जागतिक शांतता आणि प्रगतीसाठी गोमंतकीय लोकवाङ्मयातून आविष्कृत झालेले विचार मौलिक आणि मूलभूत स्वरूपाचे आहेत. जागतिक पातळीवर या अशा विचारांची चर्चा होणे आवश्यक आहे. तसेच उपरोक्त विचार सर्व स्थरावरील लोकांपर्यंत पोहचविण्याची नितांत गरज असून त्यांचे अनुकरण व कृती अपेक्षित आहे. जीवन जगत असताना इतरांप्रती आदराची भावना ठेवणे, सगळ्यांविषयी चांगलाच विचार करणे, चूकलेल्यांना क्षमा करण्याची वृत्ती बाळगणे, संयम ठेवणे, विचारपूर्वक योग्य निर्णय घेणे, सगळ्यांशी बंधुभावाने वागणे, जग एक परिवार आहे याची जाणीव ठेवणे इत्यादी अत्यंत व्यक्तीगत पातळ्यांवरील मूल्यांचा स्वीकार जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते.

**निष्कर्ष :**

१. विश्वशांती आणि प्रगती हा विषय विश्वव्यापी असुनही त्यासाठी व्यक्तीकेंद्री सकारात्मक बदल आवश्यक आहेत.

२. 'जागतिक शांताता' आणि 'प्रगती'साठी बंधुभावाने वागण्याचा संदेश लोककथा देते.

३. माणसांमाणसांत बंधुत्व आणि सामाजिक भान, हीच कारणे 'प्रगती' साधण्यास कारण ठरतात.

४. लोककथामागचा एक हेतू 'समुपदेशन' हा असतो. विश्वहीत आणि प्रगती हेच समुपदेशनातील ब्रीद ठरते.
५. कुळमी लोकवाङ्मयातून आविष्कृत झालेले जागतिक शांतता प्रस्थापित करू पाहणारे विचार सर्व स्तरातील लोकांपर्यंत पोहचवणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**


१. गावकर, जयेश. गोमंतकीय कुळमी जमातीचा शिगमाः स्वरूप, प्रकार आणि वाङ्मय. अक्षर वाङ्मय, वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड ३', प्रतिक प्रकाशन अहमदनगर (२०२३): २५.
२. गावकर, जयेश. ''गोमंतकीय कुळमी लोककथांतून आविष्कृत होणारी मानवता.'' Literature and Arts for Peace and Humanity Research Paper Presented INNSAEI Lit Fest Goa २०२२ (२०२३): ३०५.


**व्यक्तीनाम सूची :**

१. द्रौपदी अर्जून गावकर- वय ६०, कर्वे काणकोण - गोवा
२. जानू भिकरो वेळीप, वय ७५, आसाळी काणकोण - गोवा
३. गोविंद कुयरो वेळीप, वय ७१, बोणोय केपे - गोवा
४. घुरको वेळीप, वय ६९, गोकुल्डे केपे - गोवा

■■■